# An evening in Aurangabad..

# AURA 2016
## AURANGABAD



Regular concert series of Indian Classical dance showcasing the rich and diverse heritage of Aurangabad region.

**Every Friday, Saturday, Sunday; 7.30-8.30 pm at MAHAGAMI Gurukul, MGM, Aurangabad.**

A unique dance concert series named AURA-Aurangabad is being launched which aims to showcase the rich and diverse heritage of Aurangabad through Indian classical dance performances. This series catering to the cultural quest of the tourists and guests visiting the city being presented at MAHAGAMI will bring to life this wide spectrum of legends, master-pieces and monuments through the Indian classical dance forms like Kathak, Odissi, Bharatnatyam, Mohiniattam, Kuchipudi, etc. Curated by

Parwati Dutta
(Director, MAHAGAMI)

presented by
MAHĀGĀMĪ

supported by
CII
Confederation of Indian Industry



Platinum sponsor
BAGLA Total Solution

Silver sponsor
Endress+Hauser EH
People for Process Automation

**For bookings or enquiry,**
call +91 9372093189, +91 240 2484919.
(Time - 10.00 am to 6.00pm)
Information also available in Local Hotels,

Follow us on Facebook
AURA-Aurangabad

# Aura Aurangabad 2016-17

10 Dec 2016 | Kathak | JONAKI RAGHAVAN KATHAK

11 Dec 2016 | Odissi | SMITALAY ODISSI

17 Dec 2016 | Kathak | NAYANTARA PARPIA

18 Dec 2016 | Bharatnatyam | Swati Daithankar Nupuranad Academy pune

24 Dec 2016 | ODISSI | RASIKA GUMASTE AND GROUP

24 Dec 2016 | ODISSI | RASIKA GUMASTE AND GROUP

08 Jan 2017 | BHARATNATYAM | PRIYA JOSHI

14 Jan 2017 | Kathak | MANALI DEO

TIMES CITY
THE TIMES OF INDIA, AURANGABAD | MONDAY, JANUARY 16, 2017



Shri Ganesh Nritya Kala Mandir performers at the Aura Aurangabad concert,

**Kathak concert at Mahagami:** A team of artists from Shri Ganesh Nritya Kala Mandir, Thane staged an enchanting performance on Kathak dance during Aura Aurangabad concert held at Mahatma Gandhi Mission Sangeet Academy (MAHAGAMI) recently.

A press release said, "The performance included Vandana or Stuti, Kathak Taal, Dashavtar and Tarana dance compositions." Aura-Aurangabad was conceptualized by Parwati Dutta-led MAHAGAMI in the year 2013. The aim of this organisation was to make the city a culturally rich and vibrant place for tourists. It also aims to promote cultural tourism among other objectives.

CAMPUS BUZZ

SATURDAY 17 DECEMBER 2016 AURANGABAD IS TALKING ABOUT AURANGABAD TIMES OF INDIA 3

# A melange of dance, music and celebration

Aura-Aurangabad, the city's vibrant dance concert series, flagged off its fourth season last week at Sharangadev Sadan, Mahagami Gurukul, at MGM Campus. The inaugural day performance included a kathak performance by Jonaki Ranghava, who performed dances of Shiva Vandana, Thumri Maalika, Jhap Taal and Surdas Bhajan. The audience was then treated to an Odissi performance by Rupali Kadam and Sumedh Pawar (Smitalay) on day two, where the duo performed Mangalacharan, Tolagi, Kirwani, Durga and Moksha.

The dance concert aims to showcase the rich and diverse heritage of Aurangabad through Indian classical dance performances, which will be staged two days in a week (Saturdays and Sundays) in the evening to cater to the cultural quest of tourists and guests visiting the city, till the January 2017. The next concert as part of the series will be held on December 17 and 18. Watch this space for more.

— Harshvardhan Shahi



Jonaki Ranghava



Sumedh Pawar

Aura-Aurangabad, the city's vibrant dance concert series, flagged off its fourth season last week at Mahagami Gurukul, MGM. The dance concert aims the rich and diverse heritage of the city through Indian classical dance performances which will be staged two days a week in the evening to cater the cultural quest of tourists and the guests visiting the city.

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
AURANGABAD, SATURDAY, 10 DECEMBER 2016
Aurangabad FIRST NEWS PAGE 5

# Aura Aurangabad begins today

**Aurangabad, Dec 9:** Mahagami Gurul will hold dance series 'Aura Aurangabad' from December 10 at Mahagami Gurukul, MGM. Institute from 7 pm onwards.

Every year the Mahagami Gurukul organises the dance series in Aurangabad to promote cultural development and tourism in the city. This is the fourth year of the programme. In last three years nearly 85 dance programmes were held. Artists performed various dance forms highlighting countries traditions and culture. Some local artistes also showcased aspects of local heritage, sculptures and history through their dance form. Over 5000 foreign delegates visited the programme. The organisers appealed the citizens and tourists to attend the programme. The series will be held every Saturday and Sunday in the month of December and January between 7 pm to 8 pm.

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
AURANGABAD, SUNDAY, 11 DECEMBER 2016
Aurangabad FIRST PAGE 2



Kathak exponent Jonaki Raghavan performing during Aura-Aurangabad dance series which began at Mahagami Gurukul of MGM on Saturday evening.
--LT photo by Feroz Khan

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
AURANGABAD, SUNDAY, 15 JANUARY 2017
Aurangabad FIRST
PAGE 6

# Aura Aurangabad concert evokes good response

LOKMAT NEWS NETWORK
AURANGABAD, JAN 14

Aura Aurangabad last concert was held at Mahagami on Saturday. The concert included Kathak performance by Shri Ganesh Nritya Kala Mandir, Thane.

The performance included Vandana or Stuti , Kathak Taal , Dashavtar and Tarana.

Aura-Aurangabad was conceptualized and launched by Mahagami Gurukul in 2013 with an aim to make Aurangabad city a culturally rich and vibrant place for tourists; to initiate and promote cultural tourism; and to bring back the glory of Aurangabad as the favorite heritage tourist destination in India.

**Aura-Aurangabad was conceptualized and launched by Mahagami Gurukul in 2013**

The series presented 21 concerts in its 1st season and 30 in the 2nd and 3rd catering to the cultural quest of more than 5000 visitors.

This programme was designed and curated by Parwati Dutta.



Kathak performance by artists at Aura Aurangabad, at Mahagami, MGM campus in Aurangabad on Saturday

Aurangabad FIRST
AURANGABAD
Sunday,
8 January 2017



Sujatha Nair from Mumbai, in all her grace and grandeur, performs Mohiniyattam organised by Mahagami at Sharangadev Sadan, in Aurangabad on Saturday. LT photo

Sujantha Nair from Mumbai, in all her grace and grandeur, performs Mohiniyattam at the Aura-Aurangabad dance concert organized by Mahagami.

TODAY औरंगाबाद
सकाळ
औरंगाबाद, रविवार, २५ डिसेंबर २०१६
३

## ओडिसी नृत्याचे बहारदार सादरीकरण





औरंगाबाद : एमजीएमच्या महागामी गुरुकुल अकादमीतर्फे घेण्यात येणाऱ्या ऑरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेत शनिवारी पुण्याच्या रसिका गुमस्ते व ग्रुपने ओडिसी नृत्याचे बहारदार सादरीकरण केले. यामध्ये शिव तांडव, पल्लवी, दशावतार, मोक्षचे सादरीकरण केले.

हॅलो औरंगाबाद लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि. २७ डिसेंबर २०१६ ५

# ओडिसी नृत्याचा अनुपम आविष्कार

## महागामी : औरा- औरंगाबाद नृत्य शृंखला

**औरंगाबाद :** २४ डिसेंबर रोजी औरा-औरंगाबाद नृत्य शृंखलेंतर्गत महागामी गुरुकुल येथे सादर झालेल्या ओडिसी नृत्याच्या अनुपम आविष्काराने रसिक प्रभावित झाले. विलोभनीय भावमुद्रा, चंचलतेने होणाऱ्या हरकती यांच्या माध्यमातून नृत्यांगनांनी साकारलेला नृत्याविष्कार पाहून रसिक प्रभावित झाले.

रसिका गुमास्ते आणि त्यांच्या संचाने ओडिसी नृत्याचे सादरीकरण केले. 'शिवतांडव नृत्य आणि बट्टू' या प्रकाराने नृत्याविष्काराची सुरुवात झाली. यामध्ये नर्तिकांच्या चेहऱ्यावरील बोलक्या भावमुद्रांनी वातावरण निर्मिती केली. उग्र, तापट, करारी आणि प्रसंगी संयमी अशी शंकराची अनेक रुपे नर्तिकांनी सादर केली. यानंतर 'कलावती पल्लवी', 'दशावतार', 'मोक्ष' हे नृत्य प्रकार नर्तिकांनी लीलया सादर केले आणि रसिकांची भरभरुन दाद मिळविली. प्रत्येक प्रसंगाला नृत्यांगनांच्या चेहऱ्यावरील बदलते भाव आणि त्यासोबतच होणारा अप्रतिम पदन्यास उपस्थितांना भारतीय शास्त्रीय नृत्याच्या वेगळेपणाचे महत्त्व सांगून गेला.

शहराचा सांस्कृतिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने विकास होण्यासाठी मागील काही वर्षांपासून महागामी गुरुकुलतर्फे या नृत्य शृंखलेचे आयोजन करण्यात येते. या शृंखलेंतर्गत दि. ७ जानेवारी रोजी सायं. ७ वा. महागामी गुरुकुलातील शारंगदेव सदन येथे नृत्याचा पुढील कार्यक्रम होणार आहे.



**औरा- औरंगाबाद नृत्य शृंखलेंतर्गत ओडिसी नृत्य सादर करताना नृत्यांगना रसिका गुमास्ते आणि त्यांचा संच.**

लोकमत समाचार औरंगाबाद • रविवार, 8 जनवरी 2017

# अपना औरंगाबाद



औरंगाबाद में शनिवार को महागामी की औरा-औरंगाबाद नृत्य श्रृंखला के अंतर्गत मोहिनीअट्टम की प्रस्तुति देती हुईं मुंबई की नृत्यांगना सुजाता नायर. इस श्रृंखला के अंतर्गत सीता स्वयंवर का वर्णन किया गया.

विलोभनीय भावमुद्रा, चंचलतेने होणाऱ्या हरकती यांच्या माध्यमातून नृत्यांगनांनी साकारलेला नृयाविष्कार पाहून रसिक प्रभावित झाले.

TODAY औरंगाबाद सकाळ औरंगाबाद, रविवार ८ जानेवारी २०१७ ३

## मोहिनीअट्टम...!



**औरंगाबाद :** महागामी गुरुकुलतर्फे आयोजित ऑरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेत शनिवारी मुंबईच्या सुजाता नायर यांनी मोहिनीअट्टमचे बहारदार सादरीकरण केले. यात त्यांनी गणेश वंदना, रामयण वंदना, अष्टपदी प्रकाराचे सादरीकरण केले.

हॅलो औरंगाबाद | शहर विशेष | लोकमत औरंगाबाद, शनिवार, दि. १० डिसेंबर २०१६ | ३

# 'औरा' नृत्य शृंखलेस आजपासून प्रारंभ

औरंगाबाद : शहराच्या सांस्कृतिक विकासासाठी आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी महागामी गुरुकुलच्या वतीने दरवर्षी 'औरा-औरंगाबाद' या नृत्य शृंखलेचे आयोजन करण्यात येत असते. महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाही 'औरा- औरंगाबाद' नृत्य शृंखला दि. १० डिसेंबरपासून सुरु होत आहे.

कार्यक्रमाचे हे चौथे वर्षे आहे. मागील ३ वर्षांत जवळपास ८५ पेक्षाही अधिक नृत्यांचे कार्यक्रम या शृंखलेंतर्गत सादर झाले. आपल्या देशातील प्राचीन नृत्यकलेचा श्रीमंत वारसा यानिमित्ताने अनेक कलाकारांनी रंगमंचावर सादर केला. ५००० पेक्षाही अधिक विदेशी पर्यटकांनी भारतीय शास्त्रीय नृत्याचा आविष्कार यानिमित्ताने अनुभवला.

यावर्षीच्या नृत्य शृंखलेतही अनेक शास्त्रीय नृत्य प्रकारांचा आनंद घेण्याची संधी रसिकांना मिळणार आहे. या शृंखलेच्या चौथ्या सत्राचा प्रारंभ दि. १० रोजी सायं. ७ वा. महागामी गुरुकुल, एमजीएम संस्था येथे होत आहे. शहराच्या सांस्कृतिक इतिहासाची खोलवर माहिती आणि कला अनुभवण्यासाठी कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

५००० पेक्षाही अधिक विदेशी पर्यटकांनी भारतीय शास्त्रीय नृत्याचा आविष्कार औरा-औरंगाबादच्या निमित्ताने अनुभवला. शहराच्या सांस्कृतिक इतिहासाची खोलवर माहिती आणि कला अनुभवण्यासाठी कार्यक्रमाचा लाभ घेणे अनिवार्य आहे.

TODAY औरंगाबाद | सकाळ औरंगाबाद, सोमवार, १९ डिसेंबर २०१६ | ५



औरंगाबाद : एमजीएमच्या महागामी गुरुकुलतर्फे घेण्यात येत असलेल्या ऑरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेत रविवारी पुण्याच्या नूपुर दैठणकर हिने भरतनाट्यम्‌चे बहारदार सादरीकरण केले. यात त्यांनी निता वंदना, महालक्ष्मी कीर्तनम्, दशावतार, पदम् आणि तिल्लना हे प्रकार सादर केले.

TODAY औरंगाबाद | सकाळ औरंगाबाद, रविवार, १८ डिसेंबर २०१६ | ५



औरंगाबाद : महागामी गुरुकुलच्या ऑरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेत शनिवारी नयनतारा पार्पिया यांनी कथ्थक नृत्याचे सादरीकरण केले. यामध्ये अधांग, तीनताल, झुला आणि तराणा या प्रकारात बहारदार सादरीकरण केले.

शहर
न्यूज इनबॉक्स | दैनिक भास्कर, औरंगाबाद, रविवार, 25 दिसंबर, 2016 | bhaskarhindi.com | 13

# महागामी का अगला कार्यक्रम 7 को



## पर्यटकों को आकर्षित करने के दृष्टिकोण

विशेष प्रतिनिधि | औरंगाबाद

कला एवं नृत्य के क्षेत्र में विकास , शहर को सांस्कृतिक रूप से समृद्ध बनाने तथा पर्यटकों को आकर्षित करने के दृष्टिकोण से महागामी ने अगला कार्यक्रम अब 7 जनवरी 2016 को शाम 7 बजे सारंगादेव सदन में लेने का निर्णय लिया है। यह कार्यक्रम रसिका गुमास्ते एण्ड ग्रूप की ओर से प्रदर्शित की जाएगी , जिसमें शिव तांडव स्तोत्र एवं बट्टू, कलावती पल्लवी, दशावतार तथा मोक्ष ओड़िसी नृत्य पेश किए जाएंगे।

विदित हो कि महागामी गुरुकुल द्वारा वर्ष 2013 में शुरू किए गए ऊरा औरंगाबाद कार्यक्रम को काफी प्रतिसाद मिल रहा है। 7 जनवरी को पुनः आयोजित कार्यक्रम में चार प्रकार के ओडिसी नृत्यों को शामिल किया गया है जिनमें शिव तांडव स्तोत्र एवं बट्टू, कलावती पल्लवी, दशावतार तथा मोक्ष नृत्य शामिल हैं। कार्यक्रम शाम सात बजे सारंगादेव सदन में आयोजित किया जाएगा। महागामी के इन कार्यक्रमों का मुख्य उद्देश्य पूरे देश में शहर के खोए वैभव को फिर से प्राप्त करना है। शहर को सांस्कृतिक क्षेत्र का विस्तार करना, पर्यटन क्षेत्र को बढ़ावा देना आदि शामिल है। औरा औरंगाबाद सांस्कृतिक व नृत्य कार्यक्रम में लगभग पांच हजार दर्शकों के पहुंचने की उम्मीद है। इस अवसर पर विश्व के धरोहरों व पर्यटन क्षेत्रों के विकास पर भी प्रकाश डाला जाएगा। उल्लेखनीय है कि पारवती दत्ता ने इस कार्यक्रम में सांस्कृति व पर्यटन को ध्यान में रखते हुए महागामी गुरुकुल की डिजाइनिंग तैयार की है।

TODAY औरंगाबाद | सकाळ | औरंगाबाद, सोमवार ९ जानेवारी २०१७ | ३

भरतनाट्यम्...



औरंगाबाद : महागामी गुरुकुलच्या ऑरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेत रविवारी पुणे येथील प्रिया निमकर-जोशी व ग्रुपने भरतनाट्यम्‌चे बहारदार सादरीकरण केले. यामध्ये त्यांनी श्लोक मल्हारी, गणेश स्तृती, देवी स्तृती, नतेशा कुटुवम कीर्तन, अभिनय पाडा आणि तिल्लना श्लोकचे सादरीकरण केले.

नृत्याच्या माध्यमातून जीवनाचा मौलिक संदेश रसिकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न नृत्यांगना-नर्तक करतात. कलेचा आस्वाद घेत रसिकांनी संदेश आत्मसात करावा म्हणून नृत्यांत नवनवे प्रयोग करत पारंपरिकता जपली जाते.

२ | महाराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद ■ रविवार, ११ डिसेंबर २०१६ | औरंगाबाद

चंद्रकांत थोटे



सुंदरम्..! पर्यटन आणि भारतीय संस्कृतीच्या प्रसारासाठी महागामी संस्थेने 'औरा औरंगाबाद' नृत्य श्रृंखला आयोजित केली आहे. यात शनिवारी 'कथक'चे सादरीकरण झाले.

दिव्य सिटी | औरंगाबाद, सोमवार, १२ डिसेंबर २०१६ | ४ | औरंगाबाद ॲक्टिव्हिटी

नृत्यशृंखला | रूपाली कदम आणि सुमेध पवार यांचे शानदार सादरीकरण

# लयदार ओडिसी नृत्याने मिळवली रसिकांची दाद

प्रतिनिधी | औरंगाबाद







नृत्याच्या माध्यमातून जीवनाचा मौलिक संदेश किंवा रसिकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न नृत्यांगना-नर्तक करतात. कलेचा आस्वाद घेत रसिकांनी संदेश आत्मसात करावा म्हणून नृत्यांत नवनवे प्रयोग करत पारंपरिकता जपली जाते. याची प्रचिती रविवारी, ११ डिसेंबरला महागामीच्या शारंगदेव सभागृहात आली.

गुरू झेलम परांजपे यांच्या शिष्या रूपाली कदम आणि सुमेध पवार यांचा देखणा नृत्याविष्कार रसिकांना आनंद देणारा होता. दर्दी रसिकांना एकरूप करून टाकणाऱ्या या ओडिसी सादरीकरणाची सुरुवात त्यांनी परंपरेप्रमाणे मंगलाचरणाने केली. तोलागी अन् किरवाणी नृत्याच्या अंगाने फुलत गेलेला सुरेख सोहळा होता. पाण्यावर उठणारे तरंग जसे हळूहळू लांब किनाऱ्यावर बसलेल्यांपर्यंत येऊन विरतात, तसेच हे नृत्य नृत्यांगनेपासून रसिकांच्या हृदयापर्यंत येऊन पोहोचले. उत्तम पदन्यास, आकर्षक अभिनय अन् खिळवून ठेवणारा लयदारपणा हे नृत्याचे वैशिष्ट्य होते. दुर्गादेवीला आराधना करणारी दुर्गास्तुतीही नाट्यशास्त्रातील अभिनयाच्या विविध छटा दाखवणारी होती. दोघा कलावंतांचा एकमेकांशी असलेला समन्वय अचूक साधला होता. दाद मिळवणाऱ्या या सादरीकरणाने आत्मिक आनंदाने रसिकांतील चैतन्य वाढवले.

**नजाकत हीच ताकद**

भारतीय संस्कृती अन् कलाप्रकारांचा परिचय देशी-परदेशी पर्यटकांना घडवणारा सोहळा या दृष्टीने या नृत्यशृंखलेचे महत्त्व विशेष अधोरेखित होते. नजाकतीतून हळुवारपणे गहन संदेश पोहोचवण्याचे काम यातून केले जाते, हीच आपली संस्कृती आहे. **पार्वती दत्ता, संचालिका महागामी**

मानवी जीवनाचे अंतिम लक्ष्य म्हणजे मोक्ष. मोक्ष या नृत्यकृतीने स्वातंत्र्याचा आनंद दाखवण्यात आला. लयबद्ध हालचाली, शांत अन् सत्याची अनुभूती देणारे हे नृत्य चपळाईत शांतीचे सौंदर्य जपणारे होते. अश्विनी दाशरथे यांनी सूत्रसंचालनातून तयार केलेली नृत्याची पार्श्वभूमी नवरसिकांसाठी पर्वणी ठरली. याप्रसंगी महागामीच्या शिष्यांचीही उपस्थिती होती.

यांदाही विदेशी पर्यटकांसाठी स्थानिक वारसा, शिल्प, शिलालेख आणि इतिहास यांचे शास्त्रीय नृत्यातून सादरीकरण होणार आहे. नृत्यशृंखलेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महागामीतर्फे करण्यात आले आहे.



सकाळ औरंगाबाद TODAY गुरुवार ८ डिसेंबर २०१६

संक्षिप्त

## 'ऑरा-औरंगाबाद'ची शनिवारपासून शृंखला

औरंगाबाद, ता. ७ : एमजीएम महागामी गुरुकुलतर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या 'ऑरा-औरंगाबाद' या नृत्यशृंखलेस शनिवापासून (ता. दहा) प्रारंभ होणार आहे. देश-विदेशांतील पर्यटकांसाठी ही अनोखी पर्वणी ठरणार आहेत. यंदाही विविध कलांचे सादरीकरण होणार आहे. महागामीच्या सभागृहात प्रत्येक शनिवारी व रविवारी सायंकाळी सात ते आठ या वेळेत हे कार्यक्रम होणार आहेत. गेल्या वर्षी तीन सात्रांत ८५ नृत्यांचे कार्यक्रम घेण्यात आले होते. यंदाही विदेशी पर्यटकांना स्थानिक वारसा, शिल्प, शिलालेख, आणि इतिहास यांचे शास्त्रीय नृत्यातून सादरीकरण केले. यांचा नृत्यशृंखलेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महागामीतर्फे करण्यात आले आहे.



TODAY औरंगाबाद सकाळ औरंगाबाद, रविवार, ११ डिसेंबर २०१६ ८

## ऑरा-औरंगाबाद उपक्रमात कथ्थकचे बहारदार सादरीकरण

सकाळ वृत्तसेवा

औरंगाबाद, ता. १० : एमजीएम महागामी गुरुकुलतर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या 'ऑरा-औरंगाबाद' या नृत्यशृंखलेस शनिवापासून (ता. दहा) प्रारंभ झाला. शनिवारी पहिल्या सत्रात जॉन्की राघवन यांनी कथ्थकचे बहारदार सादरीकरण केले.

महागामीच्या सभागृहात सायंकाळी सात वाजता हा कार्यक्रम घेण्यात आला. सुरवातीला शिववंदना, त्यानंतर ठुमरी मलिका, त्यानंतर झपताल आणि शेवटी सूरदास भजनाने पहिल्या सत्राच्या पहिल्या दिवसाचा समारोप झाला. कार्यक्रमास मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते. रविवारी सात वाजता याच पहिल्या सत्राचे दुसऱ्या दिवशीचे सादरीकरण होणार आहे.

गेल्या वर्षी तीन सत्रांत ८५ नृत्याचे कार्यक्रम झाले. यंदाही विदेशी पर्यटकांना स्थानिक वारसा, शिल्प, शिलालेख आणि इतिहास यांचे शास्त्रीय नृत्यातून सादरीकरण होणार आहे. नृत्यशृंखलेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महागामीतर्फे करण्यात आले आहे.

औरंगाबादः महागामीच्या ऑरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेच्या पहिल्या सत्रातील शनिवारी पहिल्या दिवशी कथ्थकचे सादरीकरण करताना जॉन्की रागवने.



TODAY औरंगाबाद सकाळ औरंगाबाद, रविवार १५ जानेवारी २०१७ ३

कथ्थक सादरीकरण...

औरंगाबाद : महागामीच्या ऑरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेंत शनिवारी ठाणे येथील श्री गणेश नृत्यकला मंदिरच्या विद्यार्थिनींनी कथ्थकचे सादरीकरण केले. यात वंदना स्तृती, कथ्थक ताल, दशावतार कलाप्रकार सादर करीत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

औरंगाबाद ॲक्टिव्हिटी | दिव्य सिटी | औरंगाबाद. रविवार, ११ डिसेंबर २०१६ | ४

# पारंपरिक ठुमरीवर नृत्यांगना जोनाखी यांचे कथ्थक नृत्य

## 'औरा औरंगाबाद' नृत्य श्रृंखलेला सुरुवात

**प्रतिनिधी | औरंगाबाद**



भारतीय नृत्यकला आणि संस्कृतीचा पर्यटकांना परिचय घडवणाऱ्या औरा औरंगाबाद नृत्य श्रृंखलेला शनिवारी (१० डिसेंबर) सुरुवात झाली. मुंबईच्या नृत्यांगना जोनाखी राघवन यांच्या लयबद्ध पारंपरिक कथ्थक नृत्याने रसिकांना आनंद दिला. महान गुरू बिंदादिन महाराज रचित 'झुलत राधे नंदकिशोर'ने दाद मिळवली.

महागामी गुरुकुलाच्या शारंगदेव सभागृहात हळुवारपणे फुलत गेलेली ही नृत्य अदाकारी रसिकांसाठी पर्वणी ठरली. परंपरेनुसार शिववंदनेने सुरुवात झाली. बिंदादिन महाराजांनी रचलेल्या ठुमरी नृत्यरचना जोनाखी यांनी लयतालांची सांगड घालत सुरेखपणे सादर केली. झुलत राधे नंदकिशोर, आवत श्याम या राधेकृष्णाच्या प्रेमावर आधारित रचना कमळाप्रमाणे हळुवार उलगडत गेल्या. यानंतर पदन्यास आणि भावाभिनयाने सजलेला झपताल केला. यामध्ये आमद, तोडे, तत्कार, थाट एकाहून एक सुंदर पदन्यास लक्षवेधी ठरले. सूरदासांच्या भक्तिरचनेने नृत्याचा शेवट झाला. कोलकात्यात नृत्य प्रशिक्षणाला सुरुवात केलेल्या जोनाखी सध्या मुंबईत नृत्यसाधना करीत आहेत. महागामीची ही नृत्यश्रृंखला यशस्वी करण्यासाठी बागला ग्रुपने सहकार्य केले. ग्रुपचे संचालक ऋषी बागला, एमजीएमचे विश्वस्त अंकुशराव कदम यांच्यासह मान्यवर, रसिक आणि पर्यटकांची उपस्थिती होती.

---

# धर्म/संस्कृति

दैनिक भास्कर, औरंगाबाद, रविवार 8 जनवरी 2017 | bhaskarhindi.com | 12



## औरा-औरंगाबाद की ओर से आज नृत्य कार्यक्रम

**औरंगाबाद** | महागामी प्रोग्राम के तहत रविवार 8 जनवरी को औरा-औरंगाबाद की ओर से अगला नृत्य कार्यक्रम महागामी गुरुकुल सारंगदेव सदन में शाम 7 बजे से पेश किया जाएगा। इस नृत्य में गणेश वंदनम, रामायणा वरनम्, अष्टपदी तथा ओमनतिनक कताओ का मिश्रण होगा। विदित हो कि वर्ष 2013 से महागामी के नाम से ऊरा-औरंगाबाद नृत्य कार्यक्रम पेश किया जाता रहा है। नृत्य व विभिन्न कार्यक्रमों का मुख्य उदेश्य यह है कि शहर को पर्यटन, संस्कृति,नृत्य आदि के क्षेत्र में विकसित किया जाए। विशेष कर हेरिटेज टूरिस्ट के रूप में शहर को स्थापित किया जाए ताकि यह देश में अपना नाम और भी रोशन कर सके। विदित हो कि यह कार्यक्रम पारवती दत्ता द्वारा रेखांकित किया गया है।

---

# धर्म/संस्कृति

दैनिक भास्कर, औरंगाबाद, रविवार 11 दिसंबर 2016 | bhaskarhindi.com | 12

## महागामी का औरा-औरंगाबाद नृत्य-संगीत कार्यक्रम आज

**प्रतिनिधि | औरंगाबाद**



कला एवं नृत्य के क्षेत्र में विकसित करने, शहर को सांस्कृति रूप से समृद्ध बनाने तथा पर्यटकों को आकर्षित करने के दृष्टिकोण से महागामी द्वारा वर्ष 2013 में शुरू किए गए औरा औरंगाबाद कार्यक्रम को काफी प्रतिसाद मिल रहा है। 11 दिसंबर को पुनः आयोजित कार्यक्रम में चार प्रकार के नृत्यों को शामिल किया गया है जिनमें शिव वंदना, ठुमरी मल्लिका, झाप-ताल व सूरदास भजन शामिल हैं। विशेष कि कार्यक्रम में जोनाकी राघवन का कथक डांस आकर्षण का केंद्र होगा।महागामी के इन कार्यक्रमों का मुख्य उदेश्य पूरे देश में शहर के खोए वैभव को फिर से प्राप्त करना है। शहर को सांस्कृतिक क्षेत्र का विस्तार करना, पर्यटन क्षेत्र को बढ़ावा देना आदि शामिल है। औरा औरंगाबाद सांस्कृतिक व नृत्य कार्यक्रम में लगभग पांच हजार दर्शकों के पहुंचने की उम्मीद है। इस अवसर पर विश्व के धरोहरों व पर्यटन क्षेत्रों के विकास पर भी प्रकाश डाला जाएगा। उल्लेखनीय है कि पारवती दत्ता ने इस कार्यक्रम में सांस्कृति व पर्यटन को ध्यान में रखते हुए महागामी गुरुकुल की डिजाइनिंग तैयार की है।

---

महागामी गुरुकुलच्या शारंगदेव सभागृहात हळुवारपणे फुलत गेलेली ही नृत्य अदाकारी रसिकांना पर्वणी ठरली. यानंतर पदन्यास आणि भावाभिनयाने सजलेला झपताल झाला.

# धर्म/संस्कृति

दैनिक भास्कर, औरंगाबाद, सोमवार 16 जनवरी 2017 12

प्रस्तुति



औरंगाबाद। महागामी के औरा-औरंगाबाद नृत्य श्रृंखला में शनिवार को ठाणे की श्री गणेश नृत्यकला मंदिर के विद्यार्थियों ने कथक की प्रस्तुति की। इसमें कथक ताल, दशावतार सहित अन्य कला प्रकार से रसिक मंत्रमुग्ध हुए।

औरंगाबाद, शनिवार, १० डिसेंबर २०१६

पुण्य नगरी smart City

## औरा-औरंगाबाद नृत्य शृंखला आजपासून

**औरंगाबाद :** शहराच्या सांस्कृतिक उन्नयन आणि पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी महागामी गुरूकुलद्वारे दरवर्षी औरा - औरंगाबाद या नृत्य शृंखलेचे आयोजन केले जाते. या शृंखलेच्या चौथ्या सत्राचा प्रारंभ शनिवारी (दि.१०) संध्याकाळी सातला होणार आहे. दोन दिवस होणाऱ्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

नृत्य व विभिन्न कार्यक्रमों का मुख्य उद्देश्य यह है कि शहर को पर्यटन, संस्कृति, नृत्य आदि के क्षेत्र मे विकसित किया जाए. विशेष कर हेरिटेज टूरिस्ट के रुप मे शहर को स्थापित किया जाए ताकि यह देश मे अपना नाम और भी रोशन कर सकें.

# धर्म/संस्कृति

दैनिक भास्कर, औरंगाबाद, सोमवार 9 जनवरी 2017 bhaskarhindi.com 14

## औरा-औरंगाबाद नृत्य कार्यक्रम 14 को







**औरंगाबाद** | महागामी की ओर से 14 जनवरी को औरा-औरंगाबाद नृत्य कार्यक्रम महागामी गुरुकुल सारंगदेव सदन में शाम 7.00 बजे से पेश किया जाएगा। प्रिया निमकर जोशी द्वारा प्रस्तुत किए जाने वाले भरतनाट्यम नृत्य में स्लोक मल्लारी, गणेश स्तुती, देवी स्तुती, नातेशा कौतुवम, कृतनम, अभिनय पाडा, तिल्लाना आदि नृत्यों का संगम होगा। विदित हो कि वर्ष 2013 से महागामी के नाम से औरा-औरंगाबाद नृत्य कार्यक्रम पेश किया जाता रहा है। नृत्य व विभिन्न कार्यक्रमों का मुख्य उद्देश्य यह है कि शहर को पर्यटन, संस्कृति, नृत्य आदि के क्षेत्र में विकसित किया जाए। विशेष कर हेरिटेज टूरिस्ट के रूप में शहर को स्थापित किया जाए ताकि यह देश में अपना नाम और भी रोशन कर सकें। विदित हो कि यह कार्यक्रम पार्वती दत्ता द्वारा रेखांकित किया गया है।

2 | लोकमत समाचार • अपना औरंगाबाद

औरंगाबाद • रविवार 25 दिसंबर 2016

## मनमोहक शैली



औरंगाबाद में शनिवार को 'ऑरा' के दौरान नृत्य पेश करतीं शास्त्रीय नृत्यांगनाएं. उड़िया नृत्य को पुणे से आए दल ने प्रस्तुत कर दर्शकों को मंत्रमुग्ध कर दिया.

लोकमत

हॅलो औरंगाबाद 35वा वर्धापन दिन

औरंगाबाद, सोमवार, दि. ९ जानेवारी २०१७ | २



**बहारदार नृत्य...** औरा-औरंगाबाद नृत्य शृंखलेअंतर्गत मोहिनीहट्टम नृत्य सादर करताना नृत्यांगना सुजाता नायर.

## नृत्यातून साकारले सीता स्वयंवर

### महागामी : औरा-औरंगाबाद नृत्य शृंखला

औरंगाबाद : मोहिनीहट्टम या नृत्यप्रकारातून सुजाता नायर यांनी 'सीता-स्वयंवर'ची कथा साकारली. तेव्हा नृत्याविष्काराने रसिक प्रभावित झाले होते.

औरा-औरंगाबाद नृत्य शृंखलेअंतर्गत एमजीएममधील महागामी गुरुकुल येथे शनिवारी सायंकाळी मुंबई येथील नृत्यांगना सुजाता नायर यांनी गणेशवंदना करून नृत्याला सुरुवात केली. विलोभनीय भावमुद्रा, चंचलतेने होणाऱ्या हरकती यांच्या माध्यमातून 'सीता स्वयंवर' कथा सादर केली.

यांनंतर राम वनवास, शबरीची कथा हे रामायणातील प्रसंग त्यांनी नृत्यातून साकारले. त्यांच्या चेहऱ्यावरील बोलक्या भावमुद्रा, पदन्यासातून सर्व भाव प्रकट होत होते. अष्टनायिका याद्वारे विविध नायिकांचे रूपे सादर केली. अखेरीस त्यांनी आपल्या अभिनयातून 'आईचे मुलावरील वात्सल्य' प्रगट करणारे नृत्य सादर करून सर्वांच्या टाळ्या मिळविल्या.

शहराच्या सांस्कृतिक आणि पर्यटनांच्या दृष्टीने विकास होण्यासाठी मागील काही वर्षांपासून महागामी गुरुकुलतर्फे या नृत्य शृंखलेचे आयोजन करण्यात येते.

औरा-औरंगाबाद नृत्य शृंखले अंतर्गत महागामी गुरुकुल येथे मुंबई येथील नृत्यांगना सुजाता नायर यांनी गणेशवंदना करुन नृत्याला सुरुवात केली. विलोभनीय भावमुद्रा, चंचलतेने होणाऱ्या हरकती यांच्या माध्यमातून 'सीता स्वयंवर' कथा सादर केली.

औरंगाबाद, सोमवार, २६ डिसेंबर २०१६

महाराष्ट्र टाइम्स

औरंगाबाद TIMES OF INDIA

### शिवतांडव...



महागामी संस्थेच्या 'औरा औरंगाबाद' उपक्रमात शनिवारी पुणे येथील रसिका गुमास्ते आणि संचाने ओडिसी नृत्य सादर केले. शिवतांडव, कलावती पल्लवी, दशावतार आणि मोक्ष या नृत्य रचनांना रसिकांची दाद मिळाली.

3 | लोकमत समाचार • अपना औरंगाबाद महानगर औरंगाबाद • बुधवार 7 दिसंबर 2016

# 'औरा औरंगाबाद' 10 दिसंबर से

औरंगाबाद | 6 दिसंबर | लोस सेवा

औरंगाबाद शहर के सांस्कृतिक और पर्यटन को बढ़ावा देने के लिए प्रतिवर्ष आयोजित होने वाले 'औरा औरंगाबाद' नृत्य शृंखला 10 दिसंबर से महागामी, एमजीएम में शुरु हो रही है. यह शृंखला प्रत्येक शनिवार व रविवार को शाम 7 से 8 बजे के बीच जनवरी 2017 तक चलेगी. इसमें शहर की धरोहरों की विविध झलकियां शास्त्रीय नृत्य के माध्यम से प्रस्तुत की जाएंगी. यह शृंखला पर्यटकों, कला उपासकों के लिए भारतीय संस्कृति का विशेष रुप से औरंगाबाद के इतिहास की गहरी जानकारी व अनुभव के लिए बेहद लाभदायक है. गौरतलब है कि इस शृंखला के अब तक तीन सत्र सफलतापूर्वक आयोजित हो चुके हैं, जिसमें 5000 पर्यटकों ने नृत्य का लाभ लिया. सत्रों में स्थानीय और भारतीय धरोहर, शिल्प, शिलालेख पर आधारित भारतीय पक्ष प्रस्तुत किए गए.

हॅलो औरंगाबाद लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि. २० डिसेंबर २०१६ ८




औरा- औरंगाबाद नृत्यशृंखलेंतर्गत कथ्थक नृत्य सादर करताना नयनतारा परपिया. तर दुसऱ्या छायाचित्रात भरतनाट्यम सादर करताना नूपुर दैठणकर.

# अप्रतिम पदन्यासाने रसिक प्रभावित

औरंगाबाद : औरा- औरंगाबाद नृत्य शृंखलेंतर्गत महागामी गुरुकुल येथे दि. १७ व १८ डिसेंबर रोजी सादर झालेल्या अप्रतिम पदन्यासाने रसिक प्रभावित झाले. विलोभनीय भावमुद्रा, चंचलतेने होणाऱ्या हरकती यांच्या माध्यमातून नृत्यांगनांनी साकारलेला नृत्याविष्कार पाहून रसिक प्रभावित झाले.

नयनतारा परपिया यांनी कथ्थक नृत्याचे सादरीकरण केले. त्यांनी सादर केलेल्या अर्धांग, झुला आणि तराना या नृत्य प्रकारांना रसिकांनी भरभरून दाद दिली. तर दुसऱ्या दिवशीच्या सत्रात पुणे येथील नूपुर दैठणकर यांनी भरतनाट्यम हा नृत्य प्रकार सादर केला. नृत्यवंदनेने त्यांच्या नृत्य आराधनेला सुरुवात झाली.

यानंतर त्यांनी सादर केलेले 'महालक्ष्मी कीर्तनम', 'दशावतारम', 'पद्म' हे नृत्य प्रकार अतिशय प्रभावी ठरले. राग, आनंद, उत्कंठा, दुःख यासारख्या नवरसांनी हा कार्यक्रम रंगला होता. प्रत्येक प्रसंगाला नृत्यांगनांच्या चेहऱ्यावरील बदलते भाव आणि त्यासोबतच होणारा अप्रतिम पदन्यास उपस्थितांना भारतीय शास्त्रीय नृत्याच्या वेगळेपणाची महती सांगून गेला. शहराचा सांस्कृतिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने विकास होण्यासाठी मागील काही वर्षांपासून महागामी गुरुकुलतर्फे या नृत्य शृंखलेचे आयोजन करण्यात येते. या शृंखलेंतर्गत दि. २४ डिसेंबर रोजी सायं. ७ वा. महागामी गुरुकुलातील शारंगदेव सदन येथे नृत्याचा पुढील कार्यक्रम होणार आहे.

महाराष्ट्र टाइम्स

# औरंगाबाद TIMES

चंद्रकांत थोटे

मोक्ष...



एमजीएमच्या महागामी सभागृहात सादर झालेल्या 'औरा औरंगाबाद' उपक्रमात मुंबईच्या सुमेध पवार यांनी ओडिसी नृत्य सादर केले. यात तोलगी, किरवानी, दुर्गा आणि मोक्ष नृत्यप्रकार सादर करून त्यांनी रसिकांना खिळवून ठेवले. 'मोक्ष' मधील त्यांची एक नृत्यमुद्रा. पर्यटन नगरीत असलेल्या औरंगाबादमध्ये देश-विदेशातून आलेल्या पर्यटकांना येथील कलासंस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी 'औरा औरंगाबाद'चे आयोजन करण्यात येते.

क्रोध, आनंद, उत्सुकता और दुख जैसे नवरसों से यह कार्यक्रम सराबोर रहा. हर एक प्रसंग के दौरान नृतांगनाओ के बदलते भाव और इसके साथ होने वाले अप्रतिम पदन्यान दर्शकों को भरतीय शास्त्रीय नृत्य की अहमियत दिखाते गए.

3 | लोकमत समाचार • अपना औरंगाबाद औरंगाबाद • बुधवार 21 दिसंबर 2016

गतिविधि

# विलोभनीय नृत्य भावमुद्रा से प्रभावित हुए दर्शक

औरंगाबाद | 20 दिसंबर | लोस सेवा

औरा-औरंगाबाद नृत्य शृंखला के अंतर्गत महागामी गुरुकुल में हाल ही में पेश किए गए अप्रतिम पदन्यास से दर्शक प्रभावित हुए. विलोभनीय भावमुद्रा के माध्यम से नृत्यांगनाओं द्वारा पेश किया गया नृत्याविष्कार देखकर दर्शक खुशी से झूम उठे.

इस दौरान नयनतारा परपिया ने कथक नृत्य पेश किया. उनके द्वारा पेश किए गए 'अर्धांग झूला' और 'तराना' नृत्य प्रकार को दर्शकों ने खूब सराहा. दूसरे दिन के सत्र में पुणे की नूंपुर दैठणकर ने भरतनाट्यम् नृत्य पेश किया. उनकी नृत्य आराधना नृत्यवंदना से शुरु हुई. इसके पश्चात उनके द्वारा पेश किए गए महालक्ष्मी



कीर्तनम्, दशावतरम् और पद्म नृत्य बेहद प्रभावशाली रहे. क्रोध, आनंद, उत्सुकता और दुःख जैसे नवरसों से यह कार्यक्रम सराबोर रहा. हर एक प्रसंग के दौरान नृत्यांगनाओं के चेहरों पर बदलते भाव और इसके साथ होने वाला अप्रतिम पदन्यास दर्शकों को भारतीय शास्त्रीय नृत्य की अहमियत दिखाता गया.

शहर के सांस्कृतिक और पर्यटन की दृष्टि से विकास होने के लिए पिछले कुछ वर्षों से महागामी गुरुकुल की ओर से यह नृत्य शृंखला आयोजित की जाती है. इस शृंखला के अंतर्गत 24 दिसंबर को शाम सात बजे महागामी गुरुकुल के शारंगदेव सदन में नृत्य कार्यक्रम का आयोजन किया जाएगा.



औरा-औरंगाबाद नृत्य शृंखलेअंतर्गत कथ्थक नृत्यांगना जोनाकी राघवन यांची टिपलेली ही भावमुद्रा.

# नृत्यरूपी सरींमध्ये रसिक झाले चिंब...

## मनमोहक पदन्यास : महागामी गुरुकुल आयोजित औरा- औरंगाबाद नृत्यशृंखला

औरंगाबाद : कोसळणाऱ्या श्रावणसरी... पावसाचा आनंद लुटत नाचणारे मोर... विजेचा कडकडाट.. वाऱ्याची झुळूक या सुखद वातावरणात कृष्णाच्या विरहाने व्याकूळ झालेली राधा आणि कृष्ण आगमनानंतर होणारा हर्षोल्हास असा प्रत्येक प्रसंग मुंबई येथील कथ्थक नृत्यांगना जोनाकी राघवन यांनी त्यांच्या नृत्यातून जिवंत केला आणि रसिकांना पुन्हा एकदा श्रावण सरींमध्ये चिंब होण्याचा आनंद मिळाला.

शनिवारी सायंकाळी एमजीएम संस्थेच्या प्रांगणातील महागामी गुरुकुल येथे मोठ्या उत्साहात औरा-औरंगाबाद नृत्य शृंखलेस सुरुवात झाली. शिववंदनेने जोनाकी यांनी नृत्याविष्काराला प्रारंभ केला. 'कर्पुर गौरं करुणावतारं...' या श्लोकावर अप्रतिम पदन्यास करत त्यांनी उपस्थितांना शंकराचे विलोभनीय दर्शन घडवले. नृत्यातून सादर केलेला शंकराचा रुद्रावतार, शांत मुद्रा, गौरवर्ण, डमरू, त्रिशूळ, कंठातील नाग, डोक्यावरचा चंद्र अशा अनेक मुद्रा रसिकांना प्रभावित करून गेल्या.

यानंतर ठुमरी मालिका सादर झाली. यामध्ये कृष्णाच्या विरहात दुःखी झालेली राधा, त्यानंतर पावसाचे आगमन होताच राधिकेला झालेली कृष्णाची आठवण आणि प्रत्यक्ष श्रीकृष्णाचे आगमन होताच आनंदाने मोहरून गेलेली राधा अशा तीन प्रकारात जोनाकी यांनी ठुमरी मालिका सादर केली.

दुःख, व्याकूळता, उत्कंठा, आनंद अशा वेगवेगळ्या भावमुद्रा त्यांनी प्रभावीपणे सादर केल्या. यानंतर झपतालात सादर झालेल्या कथ्थक नृत्यातील तालपक्षाने कार्यक्रमाची सांगता झाली. संचालन अश्विनी दाशरथे यांनी केले.

याप्रसंगी महागामी गुरुकुलच्या संचालिका पार्वती दत्ता, एमजीएम संस्थेचे सचिव अंकुशराव कदम यांच्यासह रसिकांची तसेच विद्यार्थिनींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.







महागामीच्या शारंगदेव सभागृहात आयोजित कार्यक्रमात पुण्याच्या रसिका गुमास्ते आणि समूहाने ओडिसी नृत्याचे सादरीकरण केले.

# शिवतांडव, दशावताराची विविध रूपे नृत्यातून सादर

प्रतिनिधी | औरंगाबाद

शिवतांडवाचे जल्लोषपूर्ण नृत्य अन् दशावतारातून विविध रूपांचे दर्शन घडवणाऱ्या नृत्याने शनिवारी (२४ डिसेंबर) रसिकांना मोहिनी घातली. पर्यटकांना अभिजात भारतीय कलांचे दर्शन घडवणारा हा सांस्कृतिक उपक्रम दाद मिळवून गेला. ओडिसी नृत्याचे हे विलोभनीय सादरीकरण रसिकांना आनंद देणारे ठरले.

महागामीच्या शारंगदेव सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला रसिक आणि पर्यटकांची उपस्थिती होती. पुण्याच्या रसिका गुमास्ते यांनी आपल्या ग्रुपसह केलेल्या या सादरीकरणाने रसिकांना जिंकले. शिवतांडव स्तोत्र आणि बट्टू नृत्याने त्यांनी सुरुवात केली. चपळाईपूर्ण नृत्य, उत्तम अदाकारीचा हा सुरेख नजराणा रसिकांनी अनुभवला. कलावती पल्लवी या दुसऱ्या प्रस्तुतीत ओडिसी नृत्याची नजाकत पाहता आली. कवी जयदेव रचित दशावतारात विष्णूची १० रूपे दाखवताना त्यांनी केलेला अभिनय आणि नृत्याचे संचलन अद्भुत होते. मोक्ष या रचनेने सादरीकरणाचा बहारदार शेवट झाला. सादरीकरण करताना त्या प्रस्तुतीची माहिती देण्यात आली. अश्विनी दाशरथे यांनी सूत्रसंचालन केले.





# नजरबंदी करणाऱ्या नृत्याने रसिक अवाक्

## कथ्थक सादरीकरणावर परदेशी रसिक खिळले

प्रतिनिधी | औरंगाबाद

विलक्षण चपळाई, हळुवार नजाकत अन् शुद्धतेचे रंग भरणारे नृत्य शनिवारी महागामीत रंगले. नयनतारा पारपियांचे नजरबंदी करणारे कथ्थक सादरीकरण परदेशी रसिकांना खिळवणारे ठरले. जनसंमोहिनी रागातील तराणा खास दाद मिळवून गेला.

परदेशी पर्यटकांना भारतीय अभिजात कलांचे दर्शन घडवणाऱ्या नृत्यशृंखलेचे हे दुसरे सत्र होते. कलेचे सौंदर्य दाखवताना त्यामागील भाव रसिकांपर्यंत पोहोचवण्यात नयनतारा यशस्वी झाल्या. शिवपार्वतीचे अंतरंग-बाह्यरंग, मूर्त आणि अमूर्त रूप दाखवणाऱ्या अर्धांग या प्रस्तुतीने सादरीकरणाची सुरुवात लक्षवेधी झाली. कथ्थक गुरू बिरजू महाराज यांनी ही संरचना केली होती. तीनतालात कथ्थक शैलीचे सौंदर्य प्रकट केले. थाट, आमद, उठाण, परण आणि तिहाई दाखवण्यात आले. १६ मात्रांत मध्य आणि द्रुतलयीतील झालेले हे नृत्य दाद मिळवून गेले.

### आज भरतनाट्यम

रविवारी, १८ डिसेंबरला सायंकाळी ७ वाजता नूपुर दैठणकर यांचे भरतनाट्यम नृत्य सादरीकरण होणार आहे. महागामीच्या शारंगदेव सभागृहात हा कार्यक्रम होईल.

विलक्षण चपळाई, हळुवार नजाकत अन् शुद्धतेचे रंग भरणारे नृत्य शनिवारी महागामीत रंगले. नयनतारा पारपियांचे नजरबंदी करणारे कथ्थक सादरीकरण परदेशी रसिकांना खिळवणारे ठरले.

TODAY औरंगाबाद
सकाळ
औरंगाबाद, सोमवार, १२ डिसेंबर २०१६
४



औरंगाबाद : महागामीच्या ऑरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेत रविवारी ओडिसी नृत्याचे सादरीकरण करताना रूपाली कदम आणि सुमेध पवार.

# ऑरा-औरंगाबादमध्ये ओडिसीची बहार

औरंगाबाद, ता. ११ : एमजीएमच्या महागामी गुरुकुल अकादमीच्या ऑरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेच्या पहिल्या सत्राच्या दुसऱ्या दिवशी मुंबईच्या रूपाली कदम व सुमेध पवार यांनी रविवारी (ता.११) ओडिसी नृत्याचे बहारदार सादरीकरण केले.

महागामीच्या सभागृहात सायंकाळी सात वाजता हा कार्यक्रम घेण्यात आला. यात ओडिसी नृत्य प्रकारातील मंगलाचरणाने कलाकारांनी सुरवात केली. त्यानंतर 'तोलगी', 'किरवानी', 'दुर्गा' आणि 'मोक्ष' हे प्रकार सादर केले. शहरात येणाऱ्या विदेशी-पर्यटकांना औरंगाबादच्या सांस्कृतिक, नृत्यपरंपरेचे दर्शन व्हावे, येथील नृत्यसंस्कृती पर्यटकांना कळावी, यासाठी हा उपक्रम घेण्यात येत आहे. प्रत्येक शनिवारी आणि रविवारी हा कार्यक्रम घेण्यात येणार आहे, अशी माहिती महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता यांनी दिली.

महाराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद ■ सोमवार, १९ डिसेंबर २०१६ औरंगाबाद ३

# 'औरा औरंगाबाद' उपक्रमात शास्त्रीय नृत्याचे लक्षवेधी दर्शन

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

कवी जयदेव रचित काव्यावर आधारीत दशावतार नृत्याने रसिकांना शास्त्रीय नृत्याचा अस्सल आनंद दिला. महागामी संस्थेच्या 'औरा औरंगाबाद' उपक्रमात नुपूर दैठणकर यांनी हा नृत्याविष्कार सादर केला. मुद्राभिनय, पदन्यास यांनी शास्त्रीय नृत्याचे भावविभोर दर्शन घडले.

मुद्राभिनय, पदन्यास आणि लयबद्ध सादरीकरण यांनी नुपूर दैठणकर यांचे नृत्य रसिकांची दाद मिळवणारे ठरले. 'औरा औरंगाबाद' या नृत्य श्रृंखलेच्या माध्यमातून विदेशी पर्यटकांना भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न महागामी संस्था करीत आहे. या अभिजात उपक्रमाला कलाकार आणि पर्यटकांचा प्रतिसाद लाभत आहे. महागामीच्या शारंगदेव सभागृहात नृत्य सादरीकरण झाले. योग्य प्रकाशयोजना आणि शास्त्रीय वाद्यांच्या सुरेल वादनाने नृत्य श्रवणीय व प्रेक्षणीय ठरले. नृत्य वंदनेत गणेश आणि शंकराची आराधना करण्यात आली. समुद्रमंथनातून निघालेल्या अष्टदेवींची स्तुती करणाऱ्या 'महालक्ष्मी किर्तनम्' विशेष ठरले. सौंदर्यवती देवतांचे दर्शन घडवणारा हा नृत्य प्रकार होता. देवीचे प्रत्येक रूप रसिकांना मोहिनी घालणारे ठरले. 'दशावतार' रचनेत विष्णूच्या दहा रूपांचे दर्शन घडले. 'येदु कित्तनै मोडिता उमकू यन्मदी दैय्या' ही भक्तीपद्म रचना शंकरावर आधारीत होती.

भगवंताला आळवताना निंदा आणि स्तुती अशा दोन्हींचा उत्तम वापर करण्यात आला. भरतनाट्यम परंपरेप्रमाणे 'तिल्लाना' नृत्याने कार्यक्रमाचा शेवट झाला. 'केदार गौड' रागातील हा शुद्ध नृत्य प्रकार लक्षवेधी ठरला. यावेळी विदेशी रसिक, महागामीच्या शिष्यांची उपस्थिती होती. श्रुती कुलकर्णी हिने संगीत संयोजनात सहकार्य केले. स्वाती दैठणकरांच्या त्या शिष्या आहेत.



नुपूर दैठणकर यांचे नृत्य रसिकांची दाद मिळवणारे ठरले.

धर्म/संस्कृति
दैनिक भास्कर, औरंगाबाद, रविवार 18 दिसंबर 2016 bhaskarhindi.com 12

# महागामी का ऊरा-औरंगाबाद नृत्य-संगीत कार्यक्रम आज

नयनतारा परपिया का कथक डांस

विशेष प्रतिनिधि | औरंगाबाद

कला एवं नृत्य के क्षेत्र में विकास, शहर को सांस्कृति रूप से समृद्ध बनाने तथा पर्यटकों को आकर्षित करने के दृष्टिकोण से महागामी ने रविवार 18 दिसंबर रविवार को शारंगदेव सदन में कार्यक्रम का आयोजन किया है।

17 दिसंबर शनिवार को महागामी की ओर से कार्यक्रम का आयोजन किया गया जिस में नयनतारा परपिया की ओर से कथक डांस पेश किए गए। यह डांस आर्धंग, तीनताल, झूला व तराना का संमिश्रण था। विदित हो कि महागामी गुरुकुल द्वारा वर्ष 2013 में शुरू किए गए ऊरा औरंगाबाद कार्यक्रम को काफी प्रतिसाद मिल रहा है। 17 दिसंबर को पांच प्रकार के ओडिसी नृत्यों को शामिल किया गया था जिनमें मंगलाचरण, तोलागी, किवानी, दुर्गा, मोक्ष आदि नृत्य शामिल थे। आज का कार्यक्रम शाम सात बजे सारंगदेव सदन में आयोजित किया जाएगा। महागामी के इन कार्यक्रमों का मुख्य उद्देश्य पूरे देश में शहर के खोए वैभव को फिर से प्राप्त करना है। शहर के सांस्कृतिक क्षेत्र का विस्तार करना, पर्यटन क्षेत्र को बढ़ावा देना आदि शामिल है। ऊरा औरंगाबाद सांस्कृतिक व नृत्य कार्यक्रम में लगभग पांच हजार दर्शकों के पहुंचने की उम्मीद है। इस अवसर पर विश्व के धरोहरों व पर्यटन क्षेत्रों के विकास पर भी प्रकाश डाला जाएगा। उल्लेखनीय है कि पार्वती दत्ता ने इस कार्यक्रम में संस्कृति व पर्यटन को ध्यान में रखते हुए महागामी गुरुकुल की डिजाइनिंग तैयार की है।



मुद्राभिनय, पदन्यास आणि लयबद्ध सादरीकरण यांनी नुपूर दैठणकर यांचे सादरीकरण रसिकांची दाद मिळवणारे ठरले. योग्य प्रकाशयोजना आणि शास्त्रीय वाद्यांच्या सुरेल वादनाने श्रवणीय व प्रेक्षणीय ठरले.

# धर्म/संस्कृति

दैनिक भास्कर, औरंगाबाद, शुक्रवार 9 दिसंबर 2016 bhaskarhindi.com 14

## औरा औरंगाबाद नृत्य श्रृंखला कल से

शहर संवाददाता | औरंगाबाद



औरंगाबाद शहर के सांस्कृतिक उन्नयन और पर्यटन क्षेत्र के रूप में विकास के लिए महागामी गुरुकुल द्वारा प्रतिवर्ष औरा औरंगाबाद नामक नृत्य श्रृंखला का आयोजन किया जाता है। इस साल 10 दिसंबर से श्रृंखला का आरंभ किया जाएगा।

जानकारी अनुसार श्रृंखला के गत 3 गौरवपूर्ण सत्रों में 85 नृत्य कार्यक्रम आयोजित किए गए, जिसमें स्थानीय धरोहर, शिल्प, शिलालेख और इतिहस के कुछ पक्ष भारतीय शास्त्रीय नृत्यों द्वारा प्रदर्शित किए गए। लगभग 5 हजार पर्यटकों ने इस नृत्य प्रस्तुतियों द्वारा भारतीय संस्कृति का अनुभव पाया। श्रृंखला का चौथा सत्र 10 दिसंबर 2016 को आरंभ होगा। प्रत्येक शनिवार और रविवार को शाम 7 से 8 बजे तक औरंगाबाद धरोहर की विविध झलकियां नृत्य धरोहर के माध्यम से प्रस्तुत की जाएगी। नृत्य प्रस्तुतियां पर्यटकों और कला उपासकों के लिए लाभदायी सिद्ध होगी।

सभी पर्यटन संस्थाओं, गाइड, संस्थाएं, ट्रैवल सेवाओं और दर्शकों से इन अनुपम नृत्य श्रृंखला को सफल बनाने में सहयोग की अपील महागामी की ओर से की गई है।

कला एवं नृत्य के क्षेत्र में विकास, शहर को संस्कृतिक रुप से समृद्ध बनाने तथा पर्यटकों को आकर्षित करने के दृष्टिकोण से महागामी ने अगला कार्यक्रम १७ दिसंबर को तय किया है.

# धर्म/संस्कृति

दैनिक भास्कर, औरंगाबाद, सोमवार 12 दिसंबर 2016 bhaskarhindi.com 14

## महागामी का अगला औरा-औरंगाबाद नृत्य-संगीत कार्यक्रम 17 को



विशेष प्रतिनिधि | औरंगाबाद

कला एवं नृत्य के क्षेत्र में विकास, शहर को सांस्कृतिक रूप से समृद्ध बनाने तथा पर्यटकों को आकर्षित करने के दृष्टिकोण से महागामी ने अगला कार्यक्रम 17 दिसंबर को तय किया है। इस कार्यक्रम में रुपाली कदम एवं सुमेध पवार ओडिसी नृत्य पेश करेंगे जिन में मंगलाचरण, तोलागी, किवाती, दुर्गा, मोक्ष आदि नृत्य शामिल होंगे।

विदित हो कि महागामी गुरुकुल द्वारा वर्ष 2013 में शुरू किए गए ऊरा औरंगाबाद कार्यक्रम को काफी प्रतिसाद मिल रहा है। 17 दिसंबर को पुनः आयोजित कार्यक्रम में पांच प्रकार के ओडिसी नृत्यों को शामिल किया गया है जिनमें मंगलाचरण, तोलागी, किवानी, दुर्गा, मोक्ष आदि नृत्य शामिल हैं। कार्यक्रम शाम सात बजे सारंगादेव सदन में आयोजित किया जाएगा। महागामी के इन कार्यक्रमों का मुख्य उद्देश्य पूरे देश में शहर के खोए वैभव को फिर से प्राप्त करना है। शहर को सांस्कृतिक क्षेत्र का विस्तार करना, पर्यटन क्षेत्र को बढ़ावा देना आदि शामिल है। औरा औरंगाबाद सांस्कृतिक व नृत्य कार्यक्रम में लगभग पांच हजार दर्शकों के पहुंचने की उम्मीद है। इस अवसर पर विश्व के धरोहरों व पर्यटन क्षेत्रों के विकास पर भी प्रकाश डाला जाएगा। उल्लेखनीय है कि पार्वती दत्ता ने इस कार्यक्रम में सांस्कृतिक व पर्यटन को ध्यान में रखते हुए महागामी गुरुकुल की डिजाइनिंग तैयार की है।

औरंगाबाद ॲक्टिव्हिटी दिव्य सिटी औरंगाबाद. सोमवार, १९ डिसेंबर २०१६ | ६

## मंचावर अवतरले नटराज

### औरा औरंगाबाद कॉन्सर्टमध्ये नूपुर दैठणकर यांनी सादर केले लक्षवेधी नृत्य

प्रतिनिधी। औरंगाबाद

'जय जगदीश हरे.....' या कवी जयदेव यांनी रचलेल्या काव्यावर आधारित दशावतार नृत्याने रविवारी महागामीतील रसिक स्तब्ध झाले. अप्रतिम भावाभिनय, पदन्यांसावरील उत्तम प्रभुत्व अन् लय-तालाशी सुसंगत अंगाभिनयाने नूपुर दैठणकर या युवा नृत्यांगनेने रसिकांना भुरळ घातली. औरा औरंगाबाद या नृत्य शृंखलेच्या माध्यमातून परदेशी पर्यटकांना अभिजात भारतीय नृत्याचा परिचय घडवणारा हा कार्यक्रम होता.

महागामीच्या शारंगदेव सभागृहातील हा छोटेखानी सोहळा हळूवारपणे फुलत गेला. मंद दिव्यांच्या सान्निध्यात मंजूळ घुंगरांच्या बोलांच्या साथीने नृत्य तेजोमय होत गेले. नृत्य वंदनेतून भगवान गणेश आणि शंकराची आराधना करत नूपुरने नृत्याची सुरुवात केली. समुद्र मंथनातून निघालेल्या अष्टदेवींची स्तुती करणाऱ्या महालक्ष्मी कीर्तनममधून एकाहूनएक लावण्यवती देवींचे दर्शन तिने घडवले. प्रत्येक रूप रसिकांना मोहिनी घालणारे ठरले.

'दशावतार' या रचनेत विष्णूच्या १० रूपांचे दर्शन घडले. 'येदु कित्तनै मोडिता उमकू यन्मदी दैय्या' ही भक्तीपदम रचना शंकरावर आधारित होती. भक्त आपल्या भगवंताला आळवताना निंदा आणि स्तृती अशा दोन्हींचा उत्तम वापर करते हे सुंदर अभिनयातून यामध्ये पाहायला मिळाले. भरतनाट्यम परंपरेप्रमाणे तिल्लाना या नृत्याने कार्यक्रमाचा शेवट झाला. केदार गौड रागात बांधलेला हा शुद्ध नृत्य प्रकार लक्षवेधी ठरला. लयतालांचा मेळ साधत नूपुरने सादर केलेली सर्वच नृत्य दाद मिळवत होती. या वेळी परदेशी रसिक, महागामीच्या शिष्यांची उपस्थिती होती.

**पुढील नृत्यप्रकार शनिवारी संध्याकाळी**

**शहरावासीयांत नृत्याभिरूची निर्माण करण्याचा प्रयत्न या आयोजनातून केला जात आहे. श्रुती कुलकर्णी हिने त्यांना संगीत संयोजनात सहकार्य केले. स्वाती दैठणकरांच्या त्या शिष्या आहेत. अश्विनी दाशरथे यांनी सूत्रसंचालन केले. या शृंखलेतील पुढील नृत्यप्रकार महागामीच्या दालनात शनिवारी सायंकाळी ७ वाजता होणार आहे.**



नूपुर यांनी सुरेख पदन्यासातून रसिकांना मंत्रमुग्ध केले.